**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण**
**जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड.**

फोन नंबर ०२४६२-२३७१०१
ई-मेलः

क.जिनिक/क.लि./नि.आ.व्या/कावि.    /२०२१
दिनांक :-०७/०४/२०२१

**आदेश**

ज्याअर्थी, सदयस्थितीत नांदेड जिल्हयात कोरोना विषाणुच्या प्रादुर्भावात व प्रसारात पुन्हा झपाटयाने वाढ होत असून कोविड-१९ संक्रमित रूग्णांच्या संख्येत देखील झपाटयाने वाढ होत आहे.

आणि ज्याअर्थी नांदेड जिल्हयात कोरोना विषाणुमुळे होणारा कोविड-१९ आजाराबाबत दक्षता घेण्यासाठी विविध प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविल्या जात आहे.

आणि ज्याअर्थी, वाढत्या कोविड संक्रमित रूग्णांच्या संख्येमुळे रेमडेसिव्हर (Remdesivir) औषधेच्या मागणी मध्ये प्रचंड वाढ झाली आहे. यामुळे रेमडेसिव्हर (Remdesivir) औषधेचे मागणी व पुरवठा याचे नियोजन करणे अत्यंत आवश्यक झाले आहे.

त्याअर्थी विपीन इटनकर, जिल्हाधिकारी नांदेड तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नांदेड मला साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ चे कलम २, ३ व ४ अंतर्गत महाराष्ट्र कोविड-१९ नियमावली २०20 तसेच आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून रेमडेसिव्हर (Remdesivir) औषधाचा पुरवठा हॉस्पिटल येथे सुरळीत ठेवण्याकरीता व रेमडेसिव्हर (Remdesivir) पुरवठादार यांच्यावर याकरीता देखरेख व नियंत्रण ठेवण्याकरीता श्री. सुजित नरहरे, तहसीलदार, अर्धापुर अण्ड Incident Commander व श्री.रोहित राठोड, सहायक आयुक्त(औषधे), अन्न व औषध प्रशासन म.राज्य, नांदेड यांची नियुक्ती करीत आहे. नियुक्त केलेले अधिकारी यांनी रेमडेसिव्हर (Remdesivir) पुरवठा करणा-या औषध कंपनी यांच्याकडून होणारा पुरवठा व वाटप यावर नियंत्रण ठेवण्याकरीता तपासणी करून पुरवठयावर नियंत्रण ठेवावे व रेमडेसिव्हर (Remdesivir) ची कमतरता भासणार नाही याची दक्षता घ्यावी.

याद्वारे आदेशित करण्यात येते की, औषध दुकानावरून थेट रेमडेसिव्हर (Remdesivir) औषधाची विक्रीवर बंदी घालण्यात येत असून रेमडेसिव्हर (Remdesivir) औषधाचा पुरवठा स्टॉकीस्ट (Stockist) द्वारा केवळ कोविड हॉस्पिटल/हॉस्पिटलला सलंग्न असलेल्या फार्मसी येथे करण्यात यावा.

(विपीन इटनकर)
जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,नांदेड.